पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ५
सभावृत्तांत

दि.- ५/८/२०१५ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.५/८/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.श्रध्दा बाजीराव लांडे - अध्यक्षा
२ मा.आल्हाट मंदा उत्तम
३ मा. काळजे नितीन प्रताप
४ मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
५ मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
६ मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
७ मा.लोंढे शुभांगी संतोष

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.क्षेत्रीय अधिकारी- श्रीम.आशादेवी दुरगुडे, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जयंत बरशेट्टी, कार्यकारी अभियंता (पापु), मा.प्रवीण घोडे- (कार्यकारी अभियंता विद्युत,) मा.गायकवाड जी.कृ. (कार्यकारी अभियंता स्थापत्य), (मा.श्रीम.प्रभावती मा.पाटील-पर्यवेक्षक, मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.श्री.व्ही.सी.काळे – उपअभियंता, मा.श्री.वाघमारे एस.बी.-उपअभियंता, मा.साबळे भाऊसाहेब, उपअभियंता, मा.जी.एन.खेरे – सहा.निरीक्षक, मा.एस.डी.रावते - मा.एस.व्ही.बर्डे –समाजसेवक , मा.हनवते पी.एस.समाजसेवक,(नावियो विभाग) मा.एम.एम. चव्हाण – उपअभियंता (विद्युत), मा.श्री.व्ही.बी.माने, उप अभियंता, नगररचना, मा.श्रीमती शिनकर पी.पी - उप अभियंता, नगररचना, मा. वाघमारे एस.बी. उप अभियंता, स्थापत्य, मा.भोकरे रविंद्र- सहा.आरोग्य अधिकारी, मा.कोंडे के.बी. उप अभियंता, (पाणीपुरवठा), श्री.पाटील एस.वाय.- उपअभियंता (स्थापत्य) मा.सौ.भोज जयश्री – क्रीडा पर्यवेक्षिका

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक १) तरतूद वर्गीकरणाबाबत इ क्षेत्रीय कार्यालय, विद्युत विभागाकडील पत्र.

विषय क्रमांक २) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांचे कलम २०५ अन्वये दिघी –भोसरी शिवेवरील १५ मी.रस्ता घोषीत करणेबाबत. मा.चंद्रकांत (भाउ) साहेबराव वाळके यांचे पत्र.

विषय क्रमांक ३) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये १२ मी.रस्ता घोषीत करणेबाबत. मा.चंद्रकांत (भाउ) साहेबराव वाळके यांचे पत्र.

-----

त्यानंतर  खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली-

-----

१   सुचक- मा. चंद्रकांत वाळके         अनुमोदक- मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

मा.सभापती इ क्षेत्रीय कार्यालय, विनया प्रदिप (आबा) तापकीर या आजारी असल्याकारणास्तव आज सभागृहात  उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेच्या अध्यक्षस्थानी मा.श्रध्दा बाजीराव लांडे यांची  निवड करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

-----

**(मा.श्रध्दा बाजीराव लांडे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)**

भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे दिनांक २७/०७/२०१५ रोजी दु:खद निधन झाले तसेच कै.मंगेश उत्तमराव पाचारणे, उद्योजक कै.सागर सुरेश तापकीर, कै.विमल ज्ञानोबा गुळवे, कै.मारुती धोंडीबा वाळके, कै.बदामबाई चंद्रकांत लोंढे, कै.विलास वामन गव्हाणे यांचे निधन झालेने त्यांना इ प्रभाग समितीच्या वतीने भावपुर्वक श्रध्दांजली करीता सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

------

**मा.अध्यक्षा -**   इ प्रभाग समितीची सभा बुधवार दिनांक २६/०८/२०१५ रोजी दुपारी ३.०० वा.पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-

**श्रध्दा बाजीराव लांडे**

अध्यक्षा

इ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ५
सभावृत्तांत
(दि.५/८/२०१५ रोजीची तहकुब सभा)

दि.- २६/८/२०१५ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची बुधवार दि.५/८/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता ची तहकुब सभा बुधवार दिनांक २६/८/२०१५ रोजी दुपारी ३.०० वा इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर - सभापती
२ मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
३ मा. सुपे आशा रविंद्र
४ मा. गोफणे अनुराधा देविदास
५ मा.विश्वनाथ विठोबा लांडे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.जीवन गायकवाड – कार्यकारी अभियंता (स्थापत्य) मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.प्रवीण घोडे- कार्यकारी अभियंता मा.श्री.व्ही.सी.काळे – उपअभियंता, मा.श्री.वाघमारे एस.बी.-उपअभियंता,– कनिष्ट अभियंता, मा.श्री.राऊत व्ही.एस. उपअभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.अंकुश कोंडे . उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.पाटील एस.वाय.- उपअभियंता (स्थापत्य) मा.हेमंत घोड - कनिष्ट अभियंता, (स्थापत्य) मा.श्री.वाडकर एस.व्ही - कनिष्ट अभियंता, (स्थापत्य) मा.श्री.साबळे – उप अभियंता (स्थापत्य) मा.श्री. गनबोटे ए.पी.- कनिष्ट अभियंता, मा.श्री.मनोज सेठीया - उपअभियंता (जलनि:सारण), मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.श्री.रविंद्र भोकरे – सहा.आरोग्य अधिकारी, मा.श्री.रावते एम.डी. (उद्यान)

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले होते.**

विषय क्रमांक १) तरतूद वर्गीकरणाबाबत इ क्षेत्रीय कार्यालय, विद्युत विभागाकडील पत्र क्र. इक्षेका /वि/१/कावि /३४४/२०१५,दि नांक ४/४/२०१५ चे पत्र.

विषय क्रमांक २) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांचे कलम २०५ अन्वये दिघी –भोसरी शिवेवरील १५ मी.रस्ता घोषीत करणेबाबत. मा.चंद्रकांत (भाउ) साहेबराव वाळके यांचे पत्र.

विषय क्रमांक ३) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये १२ मी.रस्ता घोषीत करणेबाबत. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके यांचे पत्र.

-----

अ) दिनांक १/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा(कार्यक्रमपत्रिका ४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----

ठराव क्रमांक- ९ विषय क्रमांक- १
दिनांक- ५/८/२०१५ विभाग – आरोग्य
सूचक- मा.आशा सुपे अनुमोदक- मा.अनुराधा गोफणे
संदर्भ – इक्षेका/आ/२/कावि / ५६८/२०१४, दिनांक २४/०७/२०१५.

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विभागामध्ये सन २०१५-२०१६ चे चालू अंदाज पत्रकीय तरतुदीमध्ये आरोग्य विभागातील नाले सफाई या लेखाशिर्षावर तरतूद र.रु.१५,००,०००/- करणेत आलेली आहे. नाले सफाईची र.रु. १०,००,०००/- निविदा काढण्यात आली आहे. या लेखाशिर्षावर ५,००,०००/- शिल्लक आहे. स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर्स साफसफाई करणे हे लेखाशिर्ष इ क्षेत्रीय आरोग्य विभागाकडे नाही.तरी स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर्स साफसफाई करणे हयाचे निविदा काढण्यासाठी र.रु.१५,०१,९९२/- तरतुदीची आवश्यकता आहे. स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर्स साफसफाई करणे या कामाची निविदा काढण्यात आली असून कामाचा आदेश देण्यात आला आहे. सदरचा खर्च हा नाले सफाई हया लेखाशिर्षातून करण्यास मान्यता मिळाली आहे. सदरची तरतूद अपुरी पडत असल्याने आरोग्य विभागाकडील हॉटेल वेस्ट वाहतुक खर्च करणे या लेखाशिर्षावरील र.रु. १३,००,०००/- तरतूद शिल्लक आहे. त्यामधून नाले सफाई या लेखाशिर्षावर र.रु.१०,००,०००/- वर्ग करणे आवश्यक आहे. स्ट्रॉर्म वॉटर पावसाळी गटर्स साफसफाई करणे करीता लेखाशिर्ष नसल्याने व सदरची निविदा काढून कामाचा आदेश देण्यात आल्याने सदरचा खर्च हा नाले सफाई या लेखाशिर्षामधून करावयाचा असल्याने व नाले सफाईची निविदा काढली असल्याने त्या लेखाशिर्षावर तरतुद अपुरी पडत असल्याने **"नाले सफाई " या लेखाशिर्षावर " हॉटेल वेस्ट वाहतुक खर्च " या लेखाशिर्षावरील र.रु.१०,००,०००/- तरतूद शिल्लक असल्याने ती नाले सफाई या लेखाशिर्षावरती वर्ग करणे आवश्यक आहे.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातून दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात वर्ग करावयाच्या रकमा नियमानुसार वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

## सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक - १०  विषय क्रमांक- १

दिनांक- ५/८/२०१५  विभाग – विद्युत

सूचक- मा. मा.विश्वनाथ लांडे  अनुमोदक- मा.आशा सुपे

संदर्भ- इ क्षेत्रीय कार्यालयातील विद्युत विभागाकडील पत्र क्र.इक्षेका/१/कावि/३४४/ २०१५, दिनांक ४/८/२०१५ रोजीचे पत्र.

इ क्षेत्रीय कार्यालयाकडील विद्युत विभागाकडील स्थायी अस्थापना या लेखाशिर्षकावर सन २०१५-१६ करीता तरतुद रक्कम रुपये ३,७०,००,०००/- करणेत आलेली होती. दिनांक १/८/२०१५ अखेर स्थायी अस्थापनेवर १,३२,५७,५५६/- खर्च झालेला आहे. उर्वरीत रक्कम रुपये २,३७,४२,४४४/- इतकी रक्कम शिल्लक आहे. इ क्षेत्रीय कार्यालय विद्युत विभागाकडील अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर सन २०१५-१६ करीता र.रु.४०,०००/- इतकी तरतूद करण्यात आली होती. तरी सदर लेखाशिर्षावर दिनांक २७/५/२०१५ अखेर र.रु.७९७३/- इतका खर्च झालेला आहे. मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र. प्रशा/११/कावि/२४५/२०१५ दिनांक ६/५/२०१५ अन्वये शिकाऊ उमेदवारांना सुधारीत दराने विद्यावेतन अदा करणेबाबत कळविलेले आहे. तरी सद्यस्थितीत इ क्षेत्रीय विद्युत विभागात प्रशिक्षणार्थी कर्मचारी असून २०१५-१६ या आर्थिक वर्षात सदर कर्मचा-यांचे विद्यावेतनाची रक्कम वाढली असल्याने सदरची तरतूद अपूरी पडत आहे. अस्थायी आस्थापना लेखाशिर्षावर प्रशिक्षणार्थी वायरमन/इलेक्ट्रीशन कर्मचा-यांचे विद्यावेतन अदा करणेकामी फक्त ३२,०२७/- इतकी रक्कम शिल्लक आहे. सदर रक्कम अपूरी पडत असल्याने इ क्षेत्रीय विद्युत स्थायी आस्थापना या लेखाशिर्षावरील तरतूद र.रु.३,७०,००,०००/- मधून र.रु. ४,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख फक्त) इतकी रक्कम इ क्षेत्रीय कार्या लयाकडील विद्युत विभागाकडील अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर वर्ग करणे आवश्यक आहे. तरी सदर तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - ११  विषय क्रमांक- २

दिनांक- ५/८/२०१५

सूचक- मा.चंद्रकांत वाळके  अनुमोदक- मा.आशा सुपे

संदर्भ- मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके यांचे पत्र.

मौजे भोसरी पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेत स.नं.२२२ पै.२१९,२२० व २०५ मधून (भोसरी-दिघी शिवेवर) १५ मी.रस्ता प्रस्तावित आहे. परंतू सदरचा रस्ता मौजे भोसरी विकास योजना आराखडयात दर्शविलेला नाही. तरी सदरचा १५ मी. रस्ता मौजे भोसरी स.नं.२२२ पै.पासून स.नं.२०५ पै.पर्यंत नकाशात दाखविले प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषीत करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक- ३

दिनांक- ५/८/२०१५

सूचक- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक- मा.विश्वनाथ लांडे

संदर्भ- मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके यांचे पत्र.

मौजे दिघी येथील स.नं.७४ पै.७५ व ७८ मध्ये विकास योजनेतील १५ मी. रुंद रस्ता दर्शविणेत आला असून सदरचा रस्ता नागरीकांसाठी वापर करणे योग्य नाही. लगत स.नं. ७८ मध्ये प्रत्यक्ष जागेवर ९ मी.रस्ता अस्तित्वात आहे. तरी विकास योजनेतील १५ मी.रस्ता रद्द करुन स.नं. ७८ मधील अस्तित्वातील ९ मी. रस्ता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये १२ मी घोषीत करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

**मा. सभापती - इ क्षेत्रीय कार्यालयातील सर्व विभागातील वॉर्डवाईज टेंडर किती होते, बजेटच्या पुस्तकामध्ये टेंडर किती होते, टेंडर निघाले किती, बाकी टेंडर किती आहे, रद्द टेंडर किती आहे याबाबतचा सविस्तर अहवाल पुढच्या मासिक सभेत ( बुधवार दिनांक २/९/२०१५) रोजी शाखा प्रमुखांनी देण्यात यावा**

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/३६६/२०१५
दिनांक- २६/८/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
**( इ क्षेत्रीय कार्यालय)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.